# मिरा भाईंदर महानगरपालिका

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/ सा.प्र/82/21-22 दिनांक : 20/08/2021

## // परिपत्रक //

विषय :- महावीर जयंती, 2021 मार्गदर्शक सूचना

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांच्याकडील क्रमांक- आरएलपी-0421/ प्र.क्र.114/विशा- 1 ब, दि. 20 एप्रिल, 2021 रोजीचे परिपत्रक.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महावीर जयंती उत्सव जैन बांधवांमार्फत मोठया प्रमाणात व उत्साहाने साजरा केला जातो. चालू वर्षी दि.25 एप्रिल, 2021 रोजी महावीर जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. कोविड-19 च्या अनुषंगाने यावर्षी सर्व धर्मीय सण/उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. सध्या कोविड-19 च्या दुसऱ्या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रुग्णांच्या संख्येचा विचार करता महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापना, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक 13 एप्रिल, 2021 च्या आदेशामधील मुद्दा क्र.1,2,7 व 10 मध्ये नमूद तरतुदीच्या अधिन राहून या वर्षी महावीर जयंती उत्सव साजरा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत :-

1. महावीर जयंती उत्सव लोक मोठ्या प्रमाणात एकत्रित येऊन साजरी करतात. परंतु यावर्षी कोविड-19 चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी लोकांनी एकत्र न येता साधेपणाने आपआपल्या घरी महावीर जयंती उत्सव साजरा करणे अपेक्षित आहे.
2. कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव पाहता सर्व धार्मिक स्थळे बंद ठेवण्यात आली असल्याने मंदिरात पूजा अर्चा व दर्शनासाठी जाता येणार नाही.
3. मंदिरामधील व्यवस्थापक/ विश्वस्त यांनी शक्य असल्यास दर्शनाची ऑनलाईन सुविधा, केबल नेटवर्क, वेब साइट व फेसबुक इत्यादी द्वारे उपलब्ध करुन द्यावी.
4. महावीर जयंती उत्सवानिमित्त कोणत्याही प्रकारे प्रभात फेरी, मिरवणुका काढण्यात येऊ नयेत.
5. कोविड-19 च्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैदयकीय, शिक्षण विभाग तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका, पोलीस प्रशासन यांनी विहित

केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

उक्त परिपत्रकाची सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करावी. सदरहू परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 51 ते 60, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 व भारतीय दंड संहिता, 1860 मधील कलम 188 नुसार दंडनीय/ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत,**

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
4. मा. महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
5. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
6. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
7. मा. पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा- भाईंदर वसई-विरार.
8. मा. जिल्हाधिकारी, जि. ठाणे.
9. मा. उपमहापौर/ मा. सभापती, स्थायी समिती/ मा. सभागृह नेता/ मा. विरोधी पक्ष नेता/ सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
10. स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
11. उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
12. सर्व सहा. आयुक्त / सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.
13. मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.